# म्हापशातील केळी विक्रेत्यांवर छापे



म्हापसा : अन्न आणि औषधे प्रशासन खात्याने छापे टाकून ताब्यात केळी नष्ट केली जात असताना.

**म्हापसा**, ता. २७ (प्रतिनिधी) : अन्न आणि औषधे प्रशासन खात्याने (एफडीएने) काल बुधवारी म्हापसा बाजारपेठेतील मार्केट यार्डमध्ये छापे टाकून रसायनांचा वापर करून कृत्रिम पद्धतीने पिकवलेली सुमारे दोनशे किलो केळी नष्ट केली आहेत. हा माल हनीफ शेख चालवत असलेल्या दुकानात आढळून आला होता.

अशाप्रकारे अनैसर्गिक पद्धतीने पिकवण्यात आलेल्या केळ्यांच्या विक्रेत्यांविरोधात कारवाई करण्याची मोहीम खात्याने आता अधिक तीव्र केली आहे. उपलब्ध माहितीनुसार, गेल्या दहा दिवसांतील तिसरे छापे आहेत. यासंदर्भात खात्याचे मंत्री विश्वजित राणे यांनी दिलेल्या आदेशामुळे अशा कारवाया आता मोठ्या प्रमाणात होत आहेत.

खात्याने या संदर्भात म्हटले आहे, की केळी पिकवण्याठी रसायनांचा वापर केला जातोय का याची तपासणी करण्याची मोहीम सुरू असताना म्हापसा बाजारपेठेत विक्रेत्यांच्या आणखीन बारा आस्थापनांच्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. संबंधित ठिकाणांची कसून तपासणी करण्यात आली. तसेच त्या ठिकाणांच्या परिसरातील अन्य भागांचीही कसून तापसणी करण्यात आली.

म्हापसा मार्केट यार्डातील दुकान क्रमांक ८ व दुकान क्र. ९ येथे एका ठिकाणी कपाटात ठेवलेल्या बाटलीत इथापोन हे रसायन असल्याचे आढळून आले. ते दुकान हनीफ शेख चालवत होते. त्यानंतर त्या दुकानांतील सुमारे दोनशे किलो वजनाची केळी ताब्यात घेऊन ती केळी नष्ट करण्यासाठी पाठवण्यात आली.